<u>नियमित दिवाणी मुकदमा नं.५५८/२०१७ – निशाणी ४६ लगत आदेश</u>

संभाजी हरिबा बुरूंगले वि. विलास नामु घुटूकडे इ.

CNR No. MHSO20-002201-2017

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२अ ते २ब व प्रतिवादी क्र.५ तर्फे दाव्यास कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होऊन मिळणेसाठी केलेला आहे. सदर प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे, प्रतिवादी यांना कैफियत व म्हणणे देणेस ७ महिने विलंब झालेला आहे. प्रतिवादी क्र.२ हे मयत झालेमुळे व वेळेत कागदपत्रे न मिळालेमुळे वेळेत कैफियत व म्हणणे देता आलेली नाही. त्यामुळे सदर विलंब झालेला आहे. प्रतिवादींना झालेला विलंब माफ होवुन मिळणे न्यायाचे कामी जरूरीचे आहे. सदरचा विलंब माफ न झालेस प्रतिवादींना कैफियत देता येणार नाही. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

२. प्रस्तुत अर्जास वादी यांनी त्यांचे म्हणणे मांडले की, प्रतिवादींचा अर्ज खोटा, लबाडीचा व दिशाभुल करणारा असून वादीस मान्य नाही. प्रतिवादीने मुद्दाम जाणुनबूजून सदर दाव्याचे काम लांबणीवर पडावे या हेतूने व वादीस त्रास देणेचे हेतूने मुदतीत कैफियत दिलेली नाही. अर्जात नमूद केलेले विलंबाचे कारण संयुक्तिक नाही. सबब, अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

३. वादी, प्रतिवादींतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीने सदरचा दावा प्रतिवादीचे विरुध्द दावा वाद मिळकतीची मोजणी होवून हद्दीखुणा कायम होवुन मिळणेचा, निरंतर ताकीदीचा व अतिक्रमण क्षेत्राचा कब्जा मिळणेचा दाखल

केलेला आहे. वादी, प्रतिवादींचे कथन पाहता व दाव्याचा विषय विचारात घेता दोन्ही पक्षकारांना ऐकण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदर प्रतिवादी मुदतीमध्ये कैफियत दिलेले नाही ही बाब स्पष्ट आहे. परंतु सदरचा अर्ज मंजुर केल्याने दाव्याचा विषय गुणदोषावर निर्गत करणेसाठी मदतच होणार आहे. याउलट अर्ज नामंजूर केल्याने प्रक्रियात्मक विलंब वाढणार आहे. अर्ज मंजूर केल्याने वादीचे नुकसान होणार नाही. परंतु विलंबाचा कालावधी लक्षात घेता खर्च सदर प्रतिवादी क्र.२अ ते २ब व प्रतिवादी क्र.५ यांचेवर ठेवणे योग्य आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो –

**आ दे श**

१. प्रतिवादी क्र.२अ ते २ब व प्रतिवादी क्र.५ यांचा अर्ज (नि.क्र.४६) प्रतिवादी क्र.२अ ते २ब व प्रतिवादी क्र.५ यांनी वादी यांना रक्कम रु.५००/– (पाचशे रुपये) देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र.२अ ते २ब व प्रतिवादी क्र.५ यांना कैफियत दाखल करण्यास परवानगी देणेत येते.

POTDAR BHAGYASHRI MADHUKAR

Digitally signed by POTDAR BHAGYASHRI MADHUKAR Date: 2024.06.24 12:16:49 +0530

दिनांक – २०/०६/२०२४

( सौ. बी. एम. पोतदार )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
सांगोला.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Mrs. B. M. Potdar,<br>Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 24/06/2024 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 24/06/2024 |